(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT /Vol. XII / Issue – I ISSN 2277-8063

# महात्मा गांधीचे आर्थिक विचार

**प्रा. डॉ. के. पी. वाघमारे**, अर्थशास्त्र विभाग कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कोवाड ता. चंदगड , जि.कोल्हापूर

---

**प्रतास्वना**

महात्मा गांधी हे काही अर्थशास्त्राचे अभ्यासक नव्हते, किंवा त्यांनी अर्थशास्त्रावर स्वतंत्र ग्रंथही लिहले नाहीत. तथापी त्यांनी सत्य, अहिंसा, सर्वोदय, यांत्रिकीकरण, धर्म, समाजकारण, राजकारण किंवा जीवनाचे तत्वज्ञान मांडले होते. ते सर्व विखुरलेले होते ते एकत्र करण्याचे काम त्यांच्या अनुयायांनी केले. ज्यामध्ये डॉ. कुमारप्पांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. आजच्या बदलत्या जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाच्या परिस्थितीत भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास साधत असताना महात्मा गांधी यांचे विचार निश्चितच प्रेरणादाई व मार्गदर्शक ठरतात. त्यांचे आर्थिक विचार हे केवळ भारतासाठीच नव्हे तर संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेसाठी मार्गदर्शक ठरतात.

सदर संशोधन लेखामध्ये दुय्यम साधनांच्या वापर केला असून त्यामध्ये विविध पुस्तके, मासिके, नियतकालिके, संदर्भ ग्रंथ इत्यादीचा अवलंब केला आहे. सदर संशोधन लेखामध्ये महात्मा गांधीचे आर्थिक विचारांचा आढावा घेतला आहे.

**१. सर्वोदय**

सर्वांचे हित, सर्वांचे कल्याण, सर्वांचे मंगल हा सर्वोदायाचा मंत्र आहे. सर्वोदायातून अहिंसक मार्गाने समाजवाद आणता येईल असा त्यांचा विश्वास होता. सर्वोदय म्हणजे सर्वांना स्वातंत्र, समानता प्राप्त होईल गरीब-श्रीमंत, मालक-मजूर, जमीनदार-शेतकरी यांच्यामध्ये संघर्ष न राहता त्यांच्यात ऐक्य निर्माण व्हावे. अन्याय जुलूम यांचे उच्च्याटन सर्वोदायामध्ये त्यांना अभिप्रेत होते. त्यांच्यामते सर्वोदय म्हणजे पावित्र आणि शहानपण एकत्रिपणे नांदावेत अशा लोकशाहीची निर्मिती होय. सर्वोदायाचा आधार सत्य असेल, स्वदेशी, अहिंसा, सर्व धर्माबद्दल आदर, अस्पृश्यता निवारण, न्याय, योग्य वेतन, समान संधी, ग्रामोद्योगाचा विकास, त्याग, पवित्रजीवन इ. गोष्टी त्यांना सर्वोदयामध्ये अभिप्रेत होत्या.

थोडक्यात सर्वोदयामुळे सर्वोदयी समाज निर्माण होईल, त्यातील सर्व लोक समानतेने राहतील. ते दारिद्रय,भितीमुक्त, सर्व जाती व धर्माचा आदर सर्वोदय समाजातील व्यक्ती करतील. अस्पृश्यता पाळली जाणार नाही. मालक, मजूर किंवा जमीनदार, कुळे असा संघर्ष या समाजात असणार नाही. सर्वांना शिक्षणाची संधी योग्य मिळेल.

**२. ग्रामस्वराज्य**

महात्मा गांधीजी यांची ग्रामस्वराज्याची संकल्पना ही पूर्णपणे लोकशाही तत्वावर आधरित होती. त्यामध्ये स्वयंपूर्ण खेड्याचा समावेश अपेक्षित होता. जसे कि, अन्न, वस्त्र निवारा इ. सर्व गरजा खेड्यातच पूर्ण व्हाव्यात. स्वयंपूर्ण खेड्यात उत्पादन, उपभोग, वितरण हर सर्व एकाच वेळी घडावे, उद्योग विकेंद्रित असावेत आणि ग्रामीण भागात सुप्त बेकारी नसावी हे गांधीजीना अपेक्षित होते. यासाठी त्यांनी खेड्याकडे चला असा संदेश दिला होता.

गांधीजींची ग्रामस्वराज्याची संकल्पना अतिशय सुंदर होती. जसे कि, गावातील सर्व गरजा गावातच पूर्ण होतील. खेडी आत्मनिर्भर व स्वयंपूर्ण बनतील व इतर वस्तूसाठी त्यांना इतरवर अवलंबून राहता कामा नये. परस्पर सहकार्यावर आधारित गाव असेल. खेड्याची रचना ही निटनेटकी असावी. रस्ते व गल्ल्या स्वच्छ असाव्यात. पाण्याचा योग्य निचरा होईल अशी गटारांची रचना असावी. स्वच्छ व मुबलक पाणी पुरवठा व्हावा. गावात प्राथमिक ते पदवी पर्यंतच्या शिक्षणाची सोय असावी. गावात जाती-पाती, उच्च-निच्चता, अस्पृश्यता नसावी. खेड्यातील पंचायतीला कायदे करण्याचा, न्यायदान व अंमलबजावणी करण्याचा अधिकार असावा. खेड्यात अन्नधान्याचे उत्पादन करून शिल्लक जमिनीवर व्यापारी पिके घ्यावीत परंतु त्यामध्ये तंबाखू, अफू, यासारखी पिके घेऊ नयेत. अशा प्रकारचे ग्रामीण जीवन स्वयंपूर्ण व प्रत्येक खेडे हे एक छोटेसे प्रजासत्ताक बनविण्याचे गांधीजीचे स्वप्न होते.

**३. ग्रामोद्योग**

गांधीजींनी खादी उद्योगाला सुर्यमालेतील सुर्याची उपमा दिली आहे. यावरून याचे महत्व अधोरेखित होते. त्यांनी यांत्रिकीकरण, औद्योगिकीकरण याला विरोध केला नाही. परंतु यांत्रिकीकरण मर्यादित असावे कारण भारतासारख्या अविकसित देशात ग्रामोद्योग हाच चांगला पर्याय ठरू शकतो. गांधीजींनी अन्य उद्योगामध्ये गुळ तयार करणे, केरसुण्या, टोपल्या, दोरखंड इ. तयार करणे, याशिवाय तेल काढणे, साबण बनविणे, हाताने दळप कांडणे, कातडी कमवणे, मध काढणे इ. उद्योग सुरु करण्यावर भर दिला होता. त्यांच्या मते, असे उद्योग खेड्यामध्ये सुरु केल्यास खेडी स्वयंपूर्ण व आत्मनिर्भर बनतील. ग्रामोद्योग विशेषतः खादी व चरखा हे केवळ सूत कातण्याचे यंत्र नाही तर ग्रामीण समुद्धीचे प्रतिक आहे. ग्रामोद्योगामुळे बेकारांना काम मिळेल व संपत्तीचे विकेंद्रिकरण होऊन खेड्यातील लोकांचे राहणीमान सुधारल्याने ग्रामीण जीवन समुद्ध होईल.

**४. विकेंद्रिकरण**

महात्मा गांधीजीनी विकेंद्रिकरणाचा पुरस्कार केला होता. त्यांच्या मते, उत्पादन हे विकेंद्रित असले पाहिजे. वस्तूचे उत्पादन हे लहान प्रमाणात अनेक ठिकाणी विखुरलेले असावे. त्यामध्ये त्यांनी शेतीप्रधान व शेतीवर आधारित लघु व कुटीर उद्योगांच्या विकासावर मोठ्या प्रमाणात भर दिला. भारताची वाढती लोकसंख्या, दारिद्रय, बेकारी यासारखे प्रश्न पाहता उत्पादनाचे केंद्रीकरण झाल्याने शहरांची लोकसंख्या वाढ, प्रदूषण, शोषण, मक्तेदारी इ. समस्या निर्माण झाल्या आहेत. म्हणून उत्पादनाच्या विकेंद्रिकरणावर भर दिला. शेतीच्या विकासाबरोबरच प्रत्येक खेड्यातील प्रत्येक घरामध्ये उद्योगांना प्रोत्साहन देऊन विकास करणे गांधीजींना अभिप्रेत होते. त्यांच्या मते, प्रत्येक घर हे स्वतंत्र कारखाना बनले पाहिजे. सुत कातणे, कापड विणणे, कलाकुसर इ. उद्योग घराघरामध्ये विकसित व्हायला हेवेत असे त्यान वाटत होते.

**५. विश्वस्त संकल्पना**

महात्मा गांधीजीनी अहिंसक मार्गाने आर्थिक विषमता दूर करण्याचा प्रयत्न केला. कोणावर कोणतीही जबरदस्ती न करता अहिंसक मार्गाने आर्थिक विषमता दूर करता येऊ शकते असे त्यांनी आपल्या विश्वस्त संकल्पनेत सांगितले. विश्वस्त म्हणजे दुसऱ्याच्या मालमत्तेचा व्यवस्थापक होय. त्यांच्या मते, श्रीमंतांनी त्यांच्या मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक संपत्ती आपल्याकडे ठेऊन शिल्लक संपत्ती समाजासाठी, दीन-दुबळे, गरीब इ. च्या सेवेसाठी वापरावी. विश्वस्त म्हणजे ही जी सर्व संपत्ती आहे ती तुमची नसून समाजाची असून तुम्ही केवळ त्या संपत्तीचे व्यवस्थापक आहात. त्यांच्या मते श्रीमंत हे गरीब वर्गाच्या सहकार्याशिवाय संपत्ती मिळवू शकत नाहीत. म्हणून त्या संपत्तीवर गरीबांचा देखील हक्क आहे. प्रत्येकाने केवळ आवश्यक तेवढेच घेतल्याने गरीबी, दारिद्रय, दु:ख, दैन्य दूर होईल. कोणीही उपासमारीने मरणार नाही. आपल्याला आर्थिक विषमतेतून आर्थिक समतेकडे जायचे असल्यास यासारखा दुसरा उत्तम पर्याय नाही असे महात्मा गांधीजीचे मत होते.

**६. स्वदेशी**

महात्मा गांधीजीच्या विचारातील दूरदृष्टीचा विचार केल्यास स्वदेशी चळवळ ही फार विचारपूर्वक निर्माण केलेली चळवळ होय. स्वदेशी चळवळ ही तात्पुरती चळवळ नव्हती तर देशातल्या उद्योगाशी निघडीत होती. स्वदेशीचा म्हणजे आपण स्वत: आपल्या देशात तयार केल्या जाणाऱ्या विविध वस्तूंचा वापर करणे होय. इंग्रजाच्या आगमनापूर्वी भारतात औद्योगिक क्षेत्राची भरभराट झालेली होती. भारतीय मालाचा दर्जा सर्वोत्कृष्ट असल्याने जगभरातून या वस्तूंना प्रचंड मागणी होती. परंतु इंग्रजानी भारतामध्ये आपली राजकीय सत्ता प्रस्थापित केली. त्यानंतर भारतातील पूर्वीपार चालत आलेले लघु व कुटीर उद्योग जाणीवपूर्वक बंद पाडले. परिणामी त्या उद्योगातील कामगार देशोधडीला लागले त्याचे दु:ख, दैन्य आणि दुरवस्था वाढल्याने भारताची अर्थव्यवस्था दुबळी बनली.

भारताला या दुरवस्थेतून बाहेर काढायचे असेल तर भारतामध्ये उत्पादित झालेल्या वस्तू वापराव्यात याशिवाय दुसरा पर्याय नाही हे ओळखून स्वदेशी चळवळ सुरु केली. ज्या वस्तू आपल्या देशात तयार होतात अशाच सर्व आपण वापरल्या पाहिजेत असे त्यांनी सांगितले. उदा. अन्नधान्य, कापड इ. चे उत्पादन भारतात होत

असताना विदेशी वस्तू वापरू नये. मात्र विदेशी वस्तू मुळीच वापरू नये असे त्याचे मत नव्हते. ज्या वस्तू आपल्या देशात तयार होत नाहीत त्याचा वापर जरूर करावा उदा. औषधे असे त्यांचे मत होते.

महात्मा गांधीजीच्या स्वदेशीचा केंद्रबिंदू खादी उद्योग होता. याकरिता त्यांनी स्वत: खादीची कपडे वापरण्यास सुरुवात केली. यामधून भारतामध्ये लयास गेलेले लघु व कुटीर उद्योग पुन्हा सुरु होऊन अर्थव्यवस्थेची घडी बसण्यास मदत होईल. त्यातून ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होईल. त्यामुळे दु:ख, दैन्य, आर्थिक विषमता, दारिद्रय कमी होण्यास मदत होईल असे त्यांना वाटत होते.

**समारोप**

आज एकविसाव्या शतकात अने सामाजिक, आर्थिक समस्या गंभीर रूप धारण असताना या समस्या सोडविण्यासाठी महात्मा गांधीजीच्या विचारांची गरज आहे. सध्याच्या समाजव्यवस्थे मध्ये जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरणाने निर्माण केलेल्या समस्या उग्र स्वरूप धारण करीत आहेत. या बदलत्या परिस्थितीत मानवता व नैतिकता नष्ट होण्याच्या मार्गावर असनू मानवातील प्रेम, सहकार्य, बंधुत्व, सद्गुण, सलोखा हरवून बसला आहे. म्हणूनच महात्मा गांधीजीच्या सत्य, अहिंसा, अपरिग्रह, स्वदेशी, विश्वस्त, शेती इ. विचारांची आज गरज निर्माण झालेली आहे.

**संदर्भ**

१. कविमंडळ विजय, आर्थिक विचारांचा विकास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर १९९०
२. नलिनी पंडित, गांधी, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई,२००६
३. कुलकर्णी बी.डी. व ढमढेरे एस.व्ही.,आर्थिक विचार व विचारवंत,डायमंड पब्लिकेशन्स,पुणे, २०११
४. चव्हाण पंजाब, २१ शतकातील गांधी विचारांची प्रस्तुतता संजीवकुमार पांचाळ २०१७
५. कुमारप्पा, डॉ. जे.सी. अहिंसेचे अर्थशास्त्र, महाराष्ट्र ग्रंथ भांडार. मुंबई
६. कुमारप्पा, डॉ. जे.सी. ग्रामोद्योगाचे अर्थशास्त्र अखिल भारतीय ग्राम उद्योग संघ, वर्धा
७. https://www.tarunbharat.net/Encyc/2019/9/28/useful-thoughts-of-mahatma-gandhi.html